नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०८/२०२६ ( रविवार )**

---

## पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन मोहपा चे उद्घाटन संपन्न

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलांतर्गत शासनमान्यतेनुसार नव्याने स्थापन करण्यात आलेल्या पोलीस स्टेशन मोहपा, ता. कळमेश्वर या पोलीस स्टेशनच्या नवनिर्मित इमारतीचे उद्घाटन व अनावरण महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दिनांक ०८/०८/२०२६ रोजी उत्साहात पार पडले.

विशेष म्हणजे, पोलीस स्टेशन मोहपा हे दिनांक १३/०६/२०२६ रोजी पासून जनतेच्या सेवेत कार्यान्वित करण्यात आले असून, दिनांक ०८/०८/२०२६ रोजी त्याचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले.उद्घाटनानंतर मा. पालकमंत्री अणि इतर मान्यवरांनी पोलीस स्टेशन इमारतीची पाहणी केली.

या कार्यक्रमास मा.श्री श्यामकुमार बर्वे, खासदार मा. डॉ. राजीव पोतदार, आमदार, विधानपरीषद, श्री. आशिष देशमुख, आमदार, विधानसभा सावनेर, श्री. माधव चरजन, नगराध्यक्ष मोहोपा तसेच मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण , श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक ,श्री सागर खर्डे,सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर,श्री इश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, मोहपा तसेच इतर वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी , नागपुर ग्रामीण जिल्हयातील पोलीस पाटील, तसेच नागरिक उपस्थित होते.

मा. पालकमंत्री महोदयांनी कार्यक्रमादरम्यान सावनेर येथील अज्ञात महीला बलात्कार व खून प्रकरणातील तपासाची माहिति घेतली तसेच मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी मा. पालकमंत्री यांच्या समक्ष सदर गुन्हा कशा प्रकारे उघडकीस आला याबाबत सादरिकरण केले. मा. पालकमंत्री महोदयांनी सदर प्रकरणाचा तपास, अज्ञात आरोपींचा MARVEL – Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement या कृत्रिम बुध्दीमत्ता AI ने घेतलेला शोध, तांत्रिक व वैज्ञानिक पुराव्यांचा प्रभावी वापर तसेच तपास पथकाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबाबत नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे कौतुक केले.तसेच

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध गुन्हेगारी प्रकारांमध्ये झालेली लक्षणीय घट, गुन्हे प्रतिबंधासाठी करण्यात येत असलेली प्रभावी कार्यवाही तसेच गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण याबाबतही मा. पालकमंत्री महोदयांनी नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे कौतुक केले.गंभीर व संघटित गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी MCOCA तसेच MPDA कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईचेही मा. पालकमंत्री महोदयांनी विशेष कौतुक केले.

संपुर्ण उदघाटनाचा सोहळा उत्साहपुर्ण,आनंदमय आणि प्रेरणादायी वातावरणात गोपाल सभागृह, मोहपा येथे पार पडला.




ठाणेदार कक्ष




* डोरली भिंगारे बीट
AI-Assisted Identification of the Deceased



# नागपूर ग्रामीण पोलिसांकडून पोलीस पाटीलांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन मा. पालकमंत्री यांनी केले मार्गदर्शन

**दिनांक ०८/०८/२०२६ रोजी गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच गुन्हे प्रतिबंध आणि जनजागृतीच्या कार्यात पोलीस पाटीलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमीवर मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण , श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने पोलीस पाटीलांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन मोहोपा येथील गोपाल सभागृहात करण्यात आले**.

या कार्यशाळेस नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सुमारे ६०० पोलीस पाटील उपस्थित होते. पोलीस पाटीलांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, माहिती संकलन तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे तसेच विविध विषयांवर तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

.

**अमली पदार्थांविरोधात जनजागृती**

सदर कार्यशाळेत पोलीस अधीक्षक श्री अजित टिके, अंमली पदार्थ विरोधी पथक यांनी उपस्थित पोलीस पाटलांना अमली पदार्थमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी पोलीस प्रशासनासोबत पोलीस पाटीलांची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. गावामध्ये अमली पदार्थांची विक्री, सेवन अथवा त्यासंदर्भातील संशयास्पद हालचाली आढळून आल्यास पोलिसांना तात्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

**नक्षलवादाच्या बदलत्या स्वरूपाबाबत मार्गदर्शन**

नक्षल विरोधी अभियानाचे पोलीस निरीक्षक श्री रिवंद्र शिंदे यांनी नक्षलवादाचे बदलते स्वरूप, शहरी नक्षलवाद तसेच थ्वदजंस व्हहंदपेंजपवदे ची भूमिका याबाबतही पोलीस पाटीलांना माहिती देण्यात आली. संवेदनशील बाबींची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे आणि गावपातळीवर सतर्कता राखणे याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

**महिला व बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांबाबत जनजागृती**

पोलीस निरीक्षक श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष आणि पोलीस निरीक्षक श्री गणेश फुलकवर ,प्रभारी अधिकारी, भरोसा सेल यांनी मानव तस्करी ,महिला व बालकांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, अशा गुन्ह्यांची माहिती पोलिसांना तात्काळ देण्याची आवश्यकता तसेच गावपातळीवर पोलीस पाटीलांनी बजावायची प्रतिबंधात्मक भूमिका याबाबत मार्गदर्शन केले.

**सायबर गुन्हयांपासून नागरिकांचे संरक्षण**

पोलीस निरीक्षक श्री अरविंदकुमार कतलाम, पोलीस स्टेशन सायबर आणि त्यांचे पथक यांनी सध्याच्या डिजिटल युगात वाढत असलेल्या सायबर गुन्हे व आधुनिक डिजिटल गुन्हेगारी याबाबत पोलीस पाटीलांचे ज्ञानवर्धन करण्यात आले.

ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सोशल मीडिया, डिजिटल व्यवहार आणि सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांनी कोणती खबरदारी घ्यावी, तसेच सायबर गुन्हा घडल्यास तातडीने कोणती कार्यवाही करावी, याबाबत मार्गदर्शन केले.

**पोलीस पाटीलांचे अधिकार, हक्क व कर्तव्ये**

श्री कल्याण डहाट, उपविभागिय अधिकारी, सावनेर यांनी सदर कार्यशाळेत पोलीस पाटीलांचे अधिकार, हक्क व कर्तव्ये, पोलीस प्रशासनासोबत समन्वय, गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांची जबाबदारी, गुन्ह्यांची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे तसेच गावातील संवेदनशील परिस्थितीमध्ये पोलिसांना सहकार्य करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

**पोलीस पाटील हे प्रशासन आणि नागरिकांमधील महत्त्वाचा दुवा असुन गावातील सामाजिक परिस्थिती, गुन्हेगारी प्रवृत्ती, अवैध व्यवसाय, महिला व बालकांच्या सुरक्षेशी संबंधित बाबी तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचविण्यामध्ये पोलीस पाटीलांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.त्यामुळे गावपातळीवर गुन्हे प्रतिबंध आणि जनजागृतीसाठी पोलीस पाटीलांनी सक्रिय भूमिका बजावावी," असे आवाहन यावेळी करण्यात आले.या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे पोलीस पाटीलांचे कौशल्यवर्धन होऊन गावपातळीवरील गुन्हे प्रतिबंध, जनजागृती आणि पोलीस प्रशासनासोबतचा समन्वय अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे.**







# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# १९ गोवंश जनावरांची सुटका, २ आरोपी अटक
# स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :– दिनांक ०९/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत तारसा रोड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पोलीसांना एक संशयित सहा चक्का ट्रक क्र. एम एच–४०/सी टी–७८९३ येताना दिसला. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन त्याचे वाहन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. ट्रक मालक नामे इर्शाद अब्दुल सय्यद, वय ३५ वर्ष, रा. कामठी व गोवंश जनावरांचा मालक मोहम्मद रियाज अब्दुल रहीम कुरेशी, वय ३९ वर्ष, रा. कामठी हे पांढऱ्या रंगाचे टोयोटा ग्लान्जा कार क्र. एम एच–४०/सी क्यु –१६०८ ने ट्रकचे पायलेटिंग करीत असतांना मिळून आले. पोलीसांनी सदर ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये १९ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून सहा चक्का ट्रक क्र. एम एच–४०/सी टी–७८९३ किंमती २०,००,०००/– रूपये आणि १९ गोवंश जनावरे किंमती २,८०,०००/– रूपये, टोयोटा ग्लान्जा कार क्र. एम एच–४०/सी क्यु –१६०८ किंमती ६,००,०००/–रूपये, ०१ ॲन्डरॉईड मोबाईल किंमती १०,०००/–रूपये असा एकुण किंमती २,८९०,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी १) इर्शाद अब्दुल सय्यद, वय ३५ वर्ष, रा. कामठी २) मोहम्मद रियाज अब्दुल रहीम कुरेशी, वय ३९ वर्ष, रा. कामठी ३) ट्रक क्र. एम एच–४०/सी टी–७८९३ चा चालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ११(१), (क), (ड), (ज), (ई), (फ), प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ) (१), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.



## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ३२ हजार ९४० रूपयांचा मुद्देमाल जप्त, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०८/०८/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा मयुर गार्डन जवळ रामटेक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान डिओ मोटरसायकल क्र. एम.एच.—४०/डब्ल्यु—७५५४ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता एका थैलीमध्ये विदेशी दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे सुरेश देवीदास कामडी, वय ४६ वर्षे, रा. वार्ड क्र. ४, नगरधन, ता. रामटेक हा अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या १२ निपा किंमती २९४०/—रूपये, डिओ मोटरसायकल क्र. एम.एच.—४०/डब्ल्यु—७५५४ किंमती ३०,०००/—रू असा एकुण किंमती ३२,९४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी सुरेश देवीदास कामडी, वय ४६ वर्षे, रा. वार्ड क्र. ४, नगरधन, ता. रामटेक याचेविरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०५ गुन्हे नोंद. एकुण ३९३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०८/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ३९३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ०७ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे योगेश झितरूजी सोरते, वय ३७ वर्ष, रा. पिपळा हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. आरोपी नामे साहील बंडु नान्हे, वय २७ वर्ष, रा. सोनेगाव लोधी, बेला हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे श्रीकांत महंतु पटेल, वय ३७ वर्ष, रा. अन्नाभाउसाठे नगर, काटोल हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कुही** येथे

आरोपी नामे सुरेश श्रीराम कावळे, वय ५७ वर्ष, रा. वार्ड क्र. १, सावळी ता. कुही, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक ०८/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ईतर साहित्य तसेच वाहन असा एकुण १,२४,६६९/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे नंदु फकीरा उईके, वय ७० वर्ष, रा. नवेगाव बेलदा, ता. रामटेक, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे सुरेश देवीदास कामडी, वय ४६ वर्षे, रा. वार्ड क्र. ४, नगरधन ता. रामटेक याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे महेष नारायण मुत्तलवार, वय ४० वर्ष, रा. धर्मापुर भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी क्र. अजय सुनिल कोसरे, वय ३६ वर्ष, रा. तितुर, ता. कुही याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द
## एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०८/०८/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी १) रोहीत प्रदीप निकोडे, वय १९ वर्ष, रा. वार्ड नं. ८, कुभांरपुरा कुही, ता.कुही, जि. नागपुर २) आकाश देवानंद सोनी, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं १०, गोडबोले वार्ड कुही, ता. कुही, जि. नागपुर ३) स्वप्नील कवडु राउत, वय २३ वर्ष, रा. आरामशीनजवळ, कुही ता. कुही जि. नागपुर हे मकरधोकडा तलाव येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. सुरज गोवींदा जाधव, वय २९ वर्ष, रा. मांडवा, ता. भिवापुर, जि. नागपुर हा मोहपा फाटा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने